| MHKO170011432022 | **नियमित कब्जा क्रमांक १६९/२०२२.**<br>सौ.लिला राजाराम शिंगे<br>विरुध्द<br>श्री. विजय महादेव बनकर वगैरे |
|---|---|

## निशाणी ३३ खालील आदेश.

यातील वादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ६ नियम १७ प्रमाणे दावेमध्ये अर्जात नमुद केलेल्या कलमामध्ये ज्यादाचा मजकूर समाविष्ठ करुन दुरुस्ती करणेकरिता विनंती केली आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, प्रस्तुतचा दावा वादींनी मनाई मिळणेसाठी दाखल केला आहे. दावेचे कामी काही मजकूर अनावधानाने नमुद करणेचा राहूल गेला आहे तरी दावा अर्जी कलम ३ नंतर ३-अ म्हणून " मौजे वाडी रत्नागिरी, ता.पन्हाळा येथील केदारलिंग देवाची पुजा,अर्चा ही -------------------- करणेचा अधिकार हा वाडी रत्नागिरी येथील गुरव समाजास वंशपरंपरागत प्राप्त होत आहे " असा अर्जात नमुद केलेप्रमाणे ज्यादाचा मजकूर दाव्यामध्ये समाविष्ठ करणेस परवानगी मिळावी अशी दुरुस्ती मागीतली आहे.

३. प्रतिवादीनी सदर अर्जास निशाणी ३४ वर म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादींनी अर्जातील मजकूर नाकारला असून, वादींचा दावा कायम मनाईचा असलेमुळे दुरुस्ती कलमान्वये नमुद कथनांचा मनाईचा दावा निर्णयीत करण्याकरिता काहीही संबंध येत नाही, सर्व कथने खोटी व लबाडीची आहेत त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

४. वादीचा अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील दोन्ही बाजुंची कथने तसेच कागदपत्रे यांचे अवलोकन केले व उभय वकिलांचा युक्तीवाद ऐकला. सदरील अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दुरुस्तीकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा दावा कायम मनाईसाठीचा आहे. प्रस्तुत दाव्यात मुद्दे निश्चीती झालेली असून संपरिक्षा सुरु झालेली नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दावा दुरुस्ती संपरिक्षा पुर्व असेल तर न्यायालयाला तशी परवानगी द्यावी लागते. जर दावा दुरुस्ती संपरिक्षा चालू झालेनंतर प्रस्तावित असेल तर न्यायालय अशी दुरुस्ती मंजूर करु शकते परंतू दुरुस्ती मागणा-या पक्षकाराला यापुर्वी दुरुस्ती का मागीतली नाही याबाबत योग्य ते कारण न्यायालयास दाखवावे लागते. वर नमुद

केलेप्रमाणे प्रस्तुत प्रकरणात संपरिक्षा चालू झालेली नाही. त्यामुळे प्रस्तुत दुरुस्ती नाकारणे म्हणजे अत्यंत तांत्रीक व पांडीत्यपुर्ण (Pedantic) दृष्टीकोन ठेवल्यासारखे होईल. याठिकाणी हे नमुद करणे अत्यंत महत्वाचे आहे की, मा. सर्वोच्च व मा.उच्च न्यायालयाने असे वेळोवेळी दाखले दिले आहेत की, दावा दुरुस्तीची परवानगी देताना न्यायालयाने अति कठोर व तांत्रीक राहू नये. वादीचा दावा हा कायम मनाईसाठी असलेमुळे सदर कामी वादी मागतात त्याप्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

५. अशाप्रकारे दुरुस्ती केलेस दाव्याचा गुणदोषावर निर्णय होणेस मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादींनी जरी प्रस्तुत अर्जास हरकत घेतली असली तरी वादीने मागितलेली दुरुस्ती दाव्याचे गुणदोषावरील भवितव्यासाठी योग्य आहे. परंतू वादीने सदरची दुरुस्ती ही दावा दाखल झालेपासून तब्बल दोन वर्षांनी मागीतली आहे तसेच सदरची दुरुस्ती करणेस इतका विलंब का झाला याचे कारण देखील नमुद केलेले नाही. त्यामुळे प्रतिवादीस झालेल्या तसदीबद्दल सदरचा अर्ज काही अंशी दंडावर मंजूर करणे योग्य होईल. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

०१. वादीचा अर्ज रक्कम रुपये ५००/-(रुपये पाचशेहे फक्त ) च्या दंडावरती मंजूर करणेत येत आहे.

०२. दंडाची रक्कम वादींनी प्रतिवादींना देणेची आहे.

०३. वादीने अर्जात मागणी केलेप्रमाणे दाव्यामध्ये कलम ३ नंतर कलम ३-अ म्हणून ज्यादाचा मजकूर समाविष्ठ करुन दुरुस्ती आजपासून चौदा दिवसात करावी व दाव्याची दुरुस्त प्रत त्वरीत दाखल करावी.

Digitally signed by MANE VAISHNAVI ROHAN
Date: 2025.03.07 16:34:00 +0530

दिनांक ०६.०३.२०२५.

श्रीमती व्ही.आर.माने,
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पन्हाळा.